

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नाशिक - ४२२ २२२

मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा

नाट्यशास्त्र पदविका शिक्षणक्रम (G75) माहितीपुस्तिका

DIPLOMA IN DRAMATICS (G75) (DID)

२०१९ – २०



नाट्यशास्त्र पदविका शिक्षणक्रमाची उद्दिष्टे


१) नाट्यशास्त्र पदविका शिक्षणक्रमातील विद्यार्थ्यांना मूलभूत आणि मौलिक माहिती देणे.

२) विद्यार्थ्यांना भारतीय नाटकाच्या वैभवशाली परंपरेचा अभ्यास करण्याची संधी देणे.

३) विद्यार्थ्यांना नाट्यशास्त्र अंतर्गत येणाऱ्या निर्मिती-प्रक्रियेतील अभिनय, दिग्दर्शन आणि संबधित इतर कौशल्यांच्या प्रशिक्षण संधी उपलब्ध करून देणे.

४) विद्यार्थ्यांना नाट्यक्षेत्रातील प्रसिद्ध / नामांकित / तज्ञ लेखक, दिग्दर्शक, अभिनेते, तंत्रज्ञ यांच्यासोबत अभ्यास व संवाद साधण्याची संधी देणे.

५) विद्यार्थ्यांना नाट्यनिर्मितीचा सराव, प्रत्यक्ष रंगमंचावर सादरीकरण व स्थानिक आणि राज्य पातळीवरील नाट्य स्पर्धेत भाग घेण्याची संधी देणे.



अभ्यासक्रम

नाट्यशास्त्र पदविका शिक्षणक्रम संकेतांक - G75

पुस्तक क्र.	पुस्तकाचे नाव	संकेतांक	सैन्धान्तिक / प्रात्यक्षिक
०१	नाटक : इतिहास आणि प्रकार Drama: History &Types	DID001	सैन्धान्तिक (Th)
०२	अभिनय सिद्धांत Acting Principle	DID002	सैन्धान्तिक (Th)
०३	अभिनयाची तयारी : वाचिक अभिनय Acting Preparation : Voice Culture	DID003	प्रात्यक्षिक (Pr)
०४	अभिनयाची तयारी : कायिक अभिनय Acting Preparation : Body language Drama: History &Types	DID004	प्रात्यक्षिक (Pr)
०५	नाट्यलेखन Drama Writing	DID005	प्रात्यक्षिक (Pr)
०६	नाट्यदिग्दर्शन Direction Of Drama	DID006	प्रात्यक्षिक (Pr)
०७	नाटक आणि इतर तांत्रिक बाबी Drama & Other Techniques	DID007	प्रात्यक्षिक (Pr)
०८	नाट्यनिर्मिती प्रक्रिया Process Of Drama	DID008	प्रात्यक्षिक (Pr)



प्रवेश पात्रता

१) शासनमान्य इ. १२ वी उत्तीर्ण किंवा समकक्ष (१० + २) शैक्षणिकपात्रताधारक कोणतीही व्यक्ती या शिक्षणक्रमास प्रवेश घेऊ शकते.

विशेष सूचना

१) प्रवेश - अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

अ) शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रमाणित सत्यप्रत. (Attested Photo Copy)

आ) शैक्षणिक पात्रतेबाबतच्या गुणपत्रकांच्या प्रमाणित सत्यप्रती.

इ) नाट्यक्षेत्राचा अनुभव असल्यास प्रमाणपत्र जोडावे.

ई) प्रवेश - अर्जासोबत कोणत्याही प्रमाणपत्राची मूळ प्रत जोडू नये.

शुल्क भरण्यासंबंधी सूचना

१) विद्यापीठ नाट्यशास्त्र पदविका शिक्षणक्रम प्रवेश शुल्क एकूण रु. २५०००=०० विद्यापीठाने निर्धारित केलेल्या पद्धतीनेच (ONLINE) भरावे लागेल.

शिक्षणक्रम शुल्क

अ. क्र.	शुल्काचे शीर्षक	शुल्क (रु.)
०१	प्रवेश पात्रता परीक्षा प्रक्रिया नोंदणी शुल्क Entrance Exam. Fee	३००=००

प्रवेश पात्रता परीक्षा मूल्यमापन प्रक्रिया

निर्धारित संख्येपेक्षा अधिक अर्ज आल्यास विद्यार्थ्यांची प्रवेश पात्रता परीक्षा मूल्यमापन प्रक्रिया नाट्यक्षेत्रातील तज्ञांकडून केली जाईल.

१) नाटकाविषयी सामान्यज्ञानाचे प्रश्न.

२) नाट्यक्षेत्रातील अनुभव

३) तुम्ही काम केलेल्या नाटक / एकांकिका यातील एक उतारा साभिनय करून दाखवावा.

४) नावाजलेल्या नाटकातील एखादा प्रसंग / उतारा साभिनय करून दाखवावा.

५) कोणत्याही मराठी गोष्टीचे अथवा एका उताऱ्याचे अभिवचन करून दाखवावे.

६) आपल्या आवडीचे कोणतेही एक मराठी गाणे गुणगुणावे.

७) पाठ केलेली कोणतीही एक मराठी कविता सादर करावी.

८) कोणत्याही एका नाटकाचे नेपथ्य अथवा प्रकाशयोजना या पैकी एकाचा आराखडा काढून दाखविणे.



विद्यापीठ शुल्काचा तपशील

विद्यापीठ एकूण शिक्षणक्रम शुल्क रु. २५०००=००

अ. क्र.	शुल्काचे शीर्षक	शुल्क (रु.)
०१	परीक्षा शुल्क Exam. Fee	७५० = ००
०२	शिक्षण शुल्क Tution. Fee	१४००० = ००
०३	नोंदणी प्रवेश शुल्क Reg. Fee	१०० = ००
०४	इतर शुल्क Other Fee	१५० = ००
०५	विकासनिधी Dev. Fund	१०००० = ००
०६	अभ्यास केंद्र शुल्क Study Centre Fee	----------
	एकूण शिक्षणक्रम शुल्क (रु.)	**२५००० = ००**

कालावधी

१) सदर शिक्षणक्रम ०१ वर्ष मुदतीचा असेल.

२) अभिनयाकरिता शारीरिक (कायिक) व वाचिक तयारीसाठी निश्चित केल्याप्रमाणे दर दिवशी सराव व सादरीकरण पूर्वतयारीसाठी विशेषीकृत सराव सत्रे घेतले जातील.

३) शिक्षणक्रम एक वर्षाचा असला तरी तो प्रवेश घेतल्यापासून तीन वर्षापर्यंत पूर्ण करण्याची मुभा आहे.



माध्यम

१) अभ्यासक्रमाचे माध्यम मराठी आहे.

मूल्यमापन प्रक्रिया

या शिक्षणक्रमासाठी विद्यार्थ्यांचे मूल्यमापन दोन पद्धतीने करण्यात येईल.

१) अंतर्गत मूल्यमापन

- अ) प्रात्यक्षिक कार्यपुस्तीकेच्या आधारे मूल्यमापन
- आ) तोंडी परीक्षा
- इ) प्रत्यक्ष नाट्यनिर्मिती

२) अंतिम परीक्षा

३) प्रत्येक अभ्यासक्रमाची मूल्यमापन प्रक्रिया १०० गुणांची असेल. एकूण ०८ अभ्यासक्रमासाठी ८०० गुणांची एकूण मूल्यमापन प्रक्रिया असेल.

४) प्रत्येक अभ्यासक्रमात स्वतंत्रपणे उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य राहील.



अभ्यासकेंद्र : नाशिक

नाट्यशास्त्र पदविका शिक्षणक्रम
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
येथील मुख्य विभागीय केंद्रात शिकवला जाईल.
पत्ता : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
'ज्ञानगंगोत्री', गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन,
नाशिक - ४२२ २२२.

नोंदणी प्रक्रिया

अधिक माहिती व नोंदणी प्रवेश प्रक्रियेसाठी
ycmou.digitaluniversity.ac
या संकेतस्थळावरील 'Admissions 2019-20'
या पेजवर अथवा होमपेजवरील 'Announcement'
या ठिकाणी पहावे. **किंवा**
०२५३ २२३०१९२, ७९७२०३६६९९ या क्रमांकावर संपर्क साधावा.
प्रवेश अर्ज **दिनांक २५/०७/२०१९** पर्यंत जनसंपर्क कक्ष,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे
पोस्टाने किंवा प्रत्यक्ष येऊन जमा करावा.
दिनांक २५/०७/२०१९ सायंकाळी ५:३० वाजेनंतर
आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाही.

सचिन शिंदे,
(समन्वयक - नाट्यशास्त्र पदविका शिक्षणक्रम)